


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक


● वर्ष : ०२ ● अंक : १६१ ● पुणे ● गुरुवार, दि. ०८ मे २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




# पाकिस्तानला घरात घुसुन मारले

## ‘सिंदुर’ने घेतला ‘सिंदुरचा’ बदला : मसुद अझरचे खानदान नेस्तनाबूत : 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती दिली दोन रणरागिणींनी








### टार्गेट

- मुझफ्फराबाद
- सय्यदना बिलाल कॅम्प
- शवाई नाला कॅम्प
- कोटली
- मरकज अब्बास
- मस्कर राहील शाहिद
- बरनाला
- सियालकोट
- तेहरा कलान
- मुरीदके
- बहावलपूर

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ निरपराध लोकांचा मृत्यू झाला होता. अनेक माताभगिनींचे कुंकू (सिंदूर) त्या दिवशी पुसले गेले. कर्त्या माणसांवर दहशतवाद्यांनी घातलेल्या घाल्याने अवघा देश पेटून उठला. त्या कुंकवाची आण घेऊन भारताने ऑपरेशन सिंदूरद्वारे मंगळवारी मध्यरात्रीनंतर, बुधवारची पहाट उजाडत असताना अवघ्या पंचवीस मिनिटांत पाकिस्तानातील नऊ ठिकाणचे दहशतवादी तळ क्षेपणास्त्रांचा मारा करीत उद्ध्वस्त केले, तसेच त्यातील १०० हून अधिक दहशतवाद्यांचा खात्मा केला. या भीम पराक्रमानंतर देशवासीयांनी लष्कराला सलाम केला. दहशतवाद्यांना पोसणारा, आपल्या भूमीतून भारतात व अन्यत्र घातपाती कारवाया घडविणाऱ्या पाकिस्तानचे भारताने लष्करी कारवाईद्वारे कंबरडे मोडायचे ठरविले. त्याला ऑपरेशन सिंदूरने सुरुवात झाली. भारतीय हवाई दलाने अत्यंत अचूकपणे केलेल्या कारवाईत जैश-ए-मोहम्मद, लष्कर-ए-तोयबा यांची दहशतवादी प्रशिक्षण शिबिरे, लाँचिंग पॅड तसेच मुख्यालयांवर क्षेपणास्त्र हल्ले करून ते उद्ध्वस्त केले. ही कारवाई पाकिस्तानच्या हवाई हद्दीत न शिरता करण्यात आली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पाकिस्तान तसेच पाकव्याप्त काश्मीरमधील ज्या नऊ महत्त्वाच्या ठिकाणी दहशतवादी मोठ्या संख्येने उपस्थित होते, अशा ठिकाणांनाच लक्ष्य करण्यात आले. त्यामध्ये पाकिस्तानच्या पंजाब प्रांतातील बहावलपूर येथील जैश-ए-मोहम्मदचे मुख्यालय आणि मुरिदकेतील लष्कर-ए-तय्यबाच्या तळाचा समावेश आहे. या कारवाईला ‘ऑपरेशन सिंदूर’ असे नाव देण्यात आले. पाकिस्तानातील चार व पाकव्याप्त काश्मीरमधील पाच ठिकाणी आरोग्य केंद्रांच्या बुरख्याआड दहशतवादी प्रशिक्षण केंद्रे चालविली जात होती. भारताने तिथे हल्ला चढवून पाकिस्तानचा बुरखा टराटरा फाडला आहे. १९४७ ते २०१९ पर्यंत वेळोवेळी झालेल्या संघर्षात भारताने पाकिस्तानला नेहमीच धूळ चारली आहे. ऑपरेशन सिंदूरव्दारेदेखील पाकिस्तानमधील दहशतवाद्यांच्या प्रमुख ठिकाणांवरच भारताने घाव घातला असून त्यामुळे पाकिस्तानची अवस्था भेदरलेल्या सशासारखी झाली आहे.पाकिस्तानी सैन्याने बुधवारी जम्मू आणि काश्मीरमधील नियंत्रण रेषेजवळील गावांना लक्ष्य करून जोरदार गोळीबार केला. यात सीमेवरील गावांतील चार मुलांसह १६ जण ठार आणि १५० जण जखमी झाले. तर हरयाणाच्या पलवल येथील तरुण जवान दिनेश कुमार शहीद झाला.भारतीय सशस्त्र दलांनी दहशतवादी अड्ड्यांवर हल्ले केल्यानंतर हा गोळीबार करण्यात आला. पाकिस्तानी गोळीबारात सर्वाधिक नुकसान पूंछ जिल्ह्यात झाले आहे. भारतीय सैन्य गोळीबाराला योग्य प्रत्युत्तर देत आहे. शत्रूच्या अनेक चौक्या उद्ध्वस्त झाल्या आहेत. त्यांच्या बाजूने मोठे नुकसान झाले आहे आणि अनेक जण जखमी झाले आहेत.

नागरी वस्त्या, लष्करी ठिकाणांवर हल्ले नाहीत : भारताने सांगितले की, भारतीय हवाई दलाने बुधवारी पहाटे केलेली कारवाई ही विशिष्ट लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून केलेली आहे. आम्ही पाकिस्तानमधील नागरी वस्त्या तसेच कोणत्याही लष्करी ठिकाणावर हल्ला केलेला नाही. ज्या दहशतवादी तळांतून भारतविरोधी कारवाया केल्या जात होत्या तीच ठिकाणे आम्ही नष्ट केली.

### अजित डोभाल यांची अनेक देशांशी चर्चा



राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी अनेक देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार आणि परराष्ट्र मंत्र्यांशी चर्चा केली. त्यांना पाकिस्तान आणि पीओकेतील दहशतवाद्यांच्या तळांवर करण्यात आलेल्या हल्ल्याची माहिती दिली. अमेरिका सौदी अरेबिया, जपान, रशिया, चीन, फ्रान्स यांच्याशी डोभाल यांनी संपर्क साधला. ‘ऑपरेशन सिंदूर’ची माहिती लष्करातील दोन धडाडीच्या महिला अधिकाऱ्यांनी दिली. परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंह यांच्यासह पत्रकार परिषद घेतली. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच सशस्त्र दलातील दोन महिला अधिकाऱ्यांनी अशी पत्रकार परिषद घेतली.

### असे झाले ‘ऑपरेशन सिंदूर’

- पहलगाम हल्ल्याचा बदला घेतला आहे, अशी माहिती लष्कराने सर्वप्रथम ‘एक्स’वर मंगळवारी मध्यरात्री 1.44ला दिली. त्यानंतर केंद्र सरकारने प्रेस रिलीज जारी केली.
- ‘ऑपरेशन सिंदूर’ मोहिमेत 100 वर दहशतवादी मारले गेले.
- बुधवारी सकाळी 10.30 वाजता परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री, कर्नल सोफिया कुरेशी आणि विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी पत्रकार परिषदेत ‘ऑपरेशन सिंदूर’चा संपूर्ण घटनाक्रम सांगितला. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच संरक्षण दलातील दोन महिला अधिकाऱ्यांनी अशी पत्रकार परिषद घेतली. यावेळी ‘ऑपरेशन सिंदूर’ची चित्रफीत दाखविण्यात आली.
- मंगळवारी मध्यरात्री 1.05 वाजता ‘ऑपरेशन सिंदूर’ला सुरुवात झाली आणि 1.30 वाजता हे ऑपरेशन संपले. अत्याधुनिक राफेल विमानातून 24 क्षेपणास्त्र डागण्यात आली.
- ‘ऑपरेशन सिंदूर’चे टार्गेट फिक्स होते. लष्कर-ए- तोयबा, जैश-ए-मोहम्मद आणि हिजबुल मुजाहिद्दीनचे नऊ दहशतवादी तळ उद्ध्वस्त करण्यात आले. 100वर दहशतवाद्यांचा खात्मा करण्यात आला. अवघ्या 25 मिनिटांत हे ऑपरेशन फत्ते करण्यात आले.
- पाकिस्तानचे कोणतेही सैन्य तळ किंवा नागरी वस्तीला टार्गेट करण्यात आलेले नाही.

### आज सर्वपक्षीय बैठक

‘ऑपरेशन सिंदूर’नंतर केंद्र सरकारने उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीबाबत संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी माहिती दिली. संसद भवनातील पुस्तकालय भवनात सकाळी 11 वाजता ही बैठक होणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंह या बैठकीला उपस्थित राहणार असून सर्व पक्षांशी चर्चा करण्यात येणार आहे. या बैठकीला शिवसेना नेते, खासदार संजय राऊत शिवसेनेच्या वतीने उपस्थित राहणार आहेत.

### अचूक लक्ष्यभेद

गुप्तचर यंत्रणांच्या इनपुट्सच्या आधारे दहशतवाद्यांचे लाँचपॅड आणि प्रशिक्षण केंद्रांवर अचूक मारा करण्यात आला. पाकव्याप्त कश्मीरमधील 5 आणि पाकिस्तानातील दहशतवाद्यांचे चार अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले. पाकिस्तानचा कोणताही सैन्यतळ किंवा नागरी वस्तीला टार्गेट करण्यात आलेले नाही, असे कर्नल सोफिया कुरेशी यांनी सांगितले. केवळ दहशतवादी तळांनाच लक्ष्य करण्याच्या उद्देशाने एअरस्ट्राइक करण्यात आला. त्यानंतरही पाकिस्तानने कुठल्याही प्रकारची आगळीक केल्यास हिंदुस्थान उत्तर देण्यासाठी सज्ज आहे, असे विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी ठणकावले.

# नावातच सारे दडलेले होते...






मोहिमेचे नाव 'ऑपरेशन सिंदूर' अन् तिची माहिती दिली कर्नल सोफिया कुरेशी व विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी. बुधवारी भल्या पहाटे व नंतर सकाळी या तीन नावांनी दहशतवादी हल्ल्याचे प्रत्युत्तर महिलांच्या भावविश्वात गुंफले गेले. त्याचा संबंध महिलांना मिळालेल्या कर्तबगारीच्या संधीशीदेखील आहे. भारत व पाकिस्तानमध्ये मुख्य फरक काय, तर पाकिस्तानच्या राजकारणात लष्कर आहे आणि भारतात तसे नाही. पाकिस्तानची दुसरी कमकुवत बाजू म्हणजे भारतासारखे तिथल्या संरक्षण दलांमध्ये महिलांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान नाही. तिथल्या आर्मीत लेडी कॅडेट कोर्सच मुळी २००६ मध्ये सुरू झाला. तेव्हाच एअरफोर्समध्ये पायलटच्या संधी खुल्या झाल्या. तथापि, आर्मी, नेव्हीत अजूनही युद्धाच्या आघाडीवर महिला नाहीत. भारतात मात्र स्थलसेना, वायुसेना व नौसेनेत पुरुषांच्या बरोबरीने महिलांना संधी देण्याच्या धोरणाला दोन दशके उलटून गेली आहेत. शरद पवार केंद्रीय संरक्षणमंत्री असताना १९९२ मध्ये हे क्रांतिकारी पाऊल उचलले गेले. नंतर न्यायाचा तराजू सांभाळणाऱ्या न्यायदेवतेनेही त्यावर शिक्कामोर्तब केले.

आता महिला अधिकारी केवळ पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढतातच असे नाही, तर त्या दोन पावले पुढेही गेल्या आहेत. गुजरातमधील कर्नल सोफिया कुरेशी त्यांच्या कुटुंबातील लष्करी सेवेचा वारसा चालवतात. काही वर्षांपूर्वी पुण्यात झालेल्या बहुराष्ट्रीय लष्करी सरावात भारतीय तुकडीचे नेतृत्व त्यांनी केले, तर अति उंचावर चेतक, चित्ता ही अत्याधुनिक हेलिकॉप्टर्स चालविण्यात विंग कमांडर व्योमिका सिंह यांचा हातखंडा आहे. या दोघींची नावेही त्यांच्या कर्तृत्वाला साजेशी आहेत. 'सोफिया' या मूळ ग्रीक नावाचा अर्थ बुद्धी किंवा ज्ञान आणि 'व्योमिका' म्हणजे साक्षात आकाशकन्याच.

युद्ध ही केवळ शस्त्रांची लढाई नसते. ते अनेकदा प्रतीकांवरही लढले जाते. त्यातून संदेशही द्यायचा असतो. 'ऑपरेशन सिंदूर' नावाने असाच संदेश दिला आहे. पहलगाम येथे २२ एप्रिलला दहशतवाद्यांनी महिला व मुलांवर शस्त्र उचलत नसल्याचा साळसूदपणा दाखवताना केवळ पुरुष टिपले. डोळ्यादेखत सौभाग्य संपवले जातानाच्या यातना भोगलेल्या अभागिनींना सांगितले गेले की, 'जा आणि आम्ही काय केले ते पंतप्रधान मोदींना सांगा'. या प्रसंगातूनच 'ऑपरेशन सिंदूर' हे नाव पुढे आले. ते नाव खुद्द नरेंद्र मोदींनी सुचवल्याचे सांगितले जाते. असो. लष्करी कारवायांचे नामकरण हा इतिहासाचा एक रंजक कोपरा आहे. ही नावे रणनीती, संस्कृती आणि प्रेरणा यांचा मेळ साधतात. राष्ट्रीय अभिमानही वाढवतात. आक्रमण, बचाव किंवा शांतता मोहिमेला नाव यासाठी द्यायचे की, गुप्तता पाळतानाही तिला विशिष्ट ओळख मिळावी. मोहीम फत्ते करणाऱ्यांना हुरूप यावा. भारतीय लष्कर, नौदल, हवाई दल आणि गुप्तचर संस्था मिळून ही साधी, अर्थपूर्ण व सहज लक्षात राहणारी नावे ठरवतात. कारवाईची रणनीती, भौगोलिक व सांस्कृतिक संदर्भ किंवा प्रेरणादायी संकल्पनेशी ती नावे जोडलेली असतात.

कारगिलमधून घुसखोरांना सीमेपलीकडे पिटाळण्यासाठी १९९९ मध्ये राबविलेले 'ऑपरेशन विजय' हे नाव यशाचे, विजयाचे प्रतीक होते. सियाचीन हिमनदीवर नियंत्रणासाठी 'ऑपरेशन मेघदूत' हे संदेशवहनाचे प्रतीक कालिदासांच्या काव्यातून घेण्यात आले होते. ते उंच आणि बर्फाळ प्रदेशाशी सुसंगतही होते. १३ डिसेंबर २००१ च्या संसदेवरील भ्याड हल्ल्याला प्रत्युत्तर देताना शौर्य व धैर्याचे प्रतीक म्हणून 'ऑपरेशन पराक्रम' राबविण्यात आले. अमृतसरच्या सुवर्ण मंदिरावर कब्जा केलेल्या दहशतवाद्यांचा बीमोड करण्यासाठी १९८४ मध्ये राबविलेल्या 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार'मधील निळा रंग शीख धर्माशी, तर स्टार शब्द मंदिराच्या पावित्र्याशी संबंधित होता. २०१६ मध्ये उरी हल्ल्यानंतर पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर सर्जिकल स्ट्राइक करणाऱ्या मोहिमेला 'सूर्योदय' असे नाव देण्यात आले. 'ऑपरेशन सिंदूर'च्या रूपाने कुंकू हसले अन् आपण दोन पावले पुढे गेलो.

# जनतेसाठी धावणारा जनसेवक : सचिनभाऊ दोडके






## वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष

● शब्दांकन ●
- मा. श्री. लक्ष्मण साबळे -
निवासी संपादक
8605284272

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला मतदारसंघातील प्रश्न असो वारजे माळवाडीचा!तो प्रश्न सोडवण्यासाठी जिद्दीने काम करणारा नेता म्हणजे सचिन शिवाजीराव दोडके!

गेले वीस वर्षापासून सामाजिक असो व राजकीय क्षेत्रामध्ये दोडके बंधूंना जनतेचे लाभलेले वलय पाहता भविष्यातील मोठा नेता ह्यातून दिसून येतो.

आज 7मे त्यांचा वाढदिवस. वाढदिवसाच्या निमित्त आरंभपर्वने प्रसिद्ध केलेला हा लेखाजोखा!

एक शेतकरी कष्टकरी कुटुंबातील मुलगा ते विधानसभेमध्ये जबरदस्त फाईट देणारा "जनतेच्या मनातील आमदार"असा प्रवास नक्कीच कौतुकास पात्र आहे..

काम म्हणजे सचिन दोडके ही ओळख गेली अनेक वर्षापासून वारजे भागामध्ये रुजू झाली आहे.

ह्या भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सचिन दोडके यांनी अविरत प्रयत्न केले त्याची आता प्रचिती होत आहे..

जीवनात सहसा काही मिळत नाही त्यासाठी संधी निर्माण कराव्या लागतात.

जनतेसाठी 24 तास जनसंपर्कात असणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे. सचिनभाऊ म्हणून हक्काने नागरिक येतात व समस्या सोडवून घेतात.

वारजे माळवाडीचा नियोजनबद्ध विकास पाहता इतरांनाही एक आदर्श या निमित्त घालून दिला जातो.

खरचं लोकप्रतिनिधीनी काय कामे करायला पाहिजे हे सचिन दोडके यांच्या प्रत्येक कामातून पाहायला मिळते.

आईच्या ममतेने व स्नेही यांच्या आशीर्वादाच्या जोरावर सचिन दोडके यांनी सामाजिक कार्यास प्रारंभ केला.

छोटे मोठे प्रश्न सोडवत वारजे माळेवाडी च्या विकासासाठी विकासाचा दोडके पॅटर्न अवलंबला.



कोणत्याही क्षेत्रात सुरुवातीला संघर्ष हा ठरलेलाच असतो. अगदी त्याचप्रमाणे पहिल्या निवडणुकीमध्ये अपयश येऊनही जनतेसाठी अविरत काम केले.

पुढे जनतेने तीन टर्म त्यांना "हॅट्रिक नगरसेवक"पदाची संधी दिली. वारजे माळेवाडीचे सर्विस रस्ते असो वा इतर कोणतीही कामे यामध्ये त्यांनी स्वतःजातीने लक्ष घालून प्रत्येक कामाचा दर्जा टिकवून ठेवला आहे..

त्यांची काम करण्याची जिद्द पाहून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने खडकवासला विधानसभा मतदारसंघाची 2019 साली उमेदवारी त्यांना देण्यात आली.

केवळ बारा दिवसांमध्ये तब्बल 63 हजाराचे मताधिक्य कमी करत अवघ्या 2000 मतांनी त्यांचा पराभव झाला. नवखा उमेदवार असतानाही त्यांनी घेतलेली मते ही त्यांच्या नेतृत्वाची संपूर्ण महाराष्ट्रात दाखवून दिली..

मुंबई बेंगलोर हायवे वरील वडगाव ब्रिज व वारजे ब्रीजवरील ट्रॅफिक साठी तब्येत कमी करण्यासाठी नवीन सर्विस रस्ते व पुल यासाठी खा . सुप्रियाताई सुळे यांच्या मार्फत रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी सातत्याने पाठपुरावा केला. हे काम प्रगतीपथावर आहे. वारजे माळेवाडीच्या पाण्याची समस्या नवीन जल कुंभ बांधण्यात आले व त्यातून पाणीपुरवठा सुरू केला.

खडकवासला मतदारसंघातील कोणताही प्रश्न असो त्यासाठी सचिन दोडके यांनी नेहमी आग्रही भूमिका घेतली आहे.

**विविध सामजिक उपक्रम, क्रीडा सांस्कृतिक क्षेत्रातही योगदान** : सचिन दोडके यांनी समाजकारण व राजकारण करत असताना क्रीडा क्षेत्र असो वा सांस्कृतिक क्षेत्र यामध्येही त्यांनी प्रोत्साहन दिले आहे.

क्रिकेटप्रेमी साठी सचिन दोडके करंडक, तसेच सर्व मैदानी खेळ व इतर खेळासाठी वारजे ऑलम्पिक गेली अनेक वर्षापासून सुरू आहे.

यामध्ये अनेक खेळाडूंना याचा चांगला फायदा झाला आहे.आणि खेळाडू राज्यस्तरीय देशांतर्गत स्पर्धेमध्ये ही सहभागी झाले आहेत.

वारजे माळवाडी परिसरातील नागरिकांसाठी वारजे सांस्कृतिक महोत्सव सुरू करण्यात आला आहे. यासही नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो आहे.

दरवर्षी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त परिसरातील नागरिकांना मोफत दूध पुरवठा करण्यात येतो. याशिवाय लहान मुलांसाठी मोफत पतंग व आंबा खाण्याची स्पर्धा, बाल मेळावा यासारखे विविध कार्यक्रम घेण्यात आले आहेत.

हे सर्व कार्यक्रम आयोजित करत असताना यातील सातत्य हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

सर्वात मोठा उंच ध्वजारोहण ही वारजे माळवाडी मध्ये करण्यात येते. ह्याचा मान नागरिकांना देण्यात येतो..

जनतेविषयी सामाजिक बांधिलकी जपणारा हा नेता सातत्याने खडकवासला मतदारसंघांमध्ये अविरत प्रयत्न करत आहे. निवडणुका असो वा नसो जनतेसाठी धावणारा जनसेवक ही खरी ओळख सचिन दोडके यांची आहे..

जीवनात सगळेच दिवस आपले सारखे नसतात त्यातूनही मार्ग काढत जनहितार्थ प्रयत्न करणे सचिन दोडके यांनी सोडले नाही..

त्यामुळे खडकवासला मतदारसंघातील जनतेला त्यांच्याकडून आगामी काळात ही खूप काही अपेक्षा आहेत हे मात्र त्रिकाल सत्य आहे.

**सचिन भाऊंना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा!**






दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२

दैनिक आरंभपर्व
SPECIAL OFFERS ई-पेपर वेबसाईट बनवा फक्त २९९९/-
1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक
RNI No.-MAHMAR/2023/89313
दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज .. इथं आहे जनहिताचे सर्व दैनिक आरंभपर्व
पुणे जिल्हा
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर
पुणे शहर
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा
इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com
वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक
(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

## थोडक्यात



### शिरूरच्या वधू-वरांचा भारतातील पारंपरिक पद्धतीने विवाह सोहळा

तळेगाव ढमढेरे (आरंभ पर्व) : पुणे (मूळगाव रांजणगाव गणपती, ता. शिरूर) येथील ऐश्वर्या विजय लांडे (एम.एस. इन आर्किटेक्चर) आणि निमगाव भोगी (ता. शिरूर) येथील विशाल राजाराम सांबारे (एम.एस. इन पॉलिमर इंजिनिअरिंग), या उच्चशिक्षित वधू-वरांनी अमेरिकेतील डलास शहरात भारतातील पारंपरिक हिंदू वैदिक पद्धतीने विवाहबद्ध होऊन आपली समृद्ध संस्कृती जपली आहे. मंगलप्रसंगी विवाहपूर्व व विवाहाचे सर्व विधी अत्यंत संगीत व आनंदमय वातावरणात पार पडले. २० एप्रिल २०२५ रोजी विवाह सोहळ्याची सुरुवात सीमंत पूजन या विधीने झाली. यानंतर २१ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता पारंपरिक मराठमोळ्या पद्धतीने साखरपुडा झाला. त्यानंतर पाश्चात्त्य संस्कृतीनुसार रिंग सेरेमनी उत्साहात संपन्न झाली. येथील उपस्थित पाहुण्यांनी महाराष्ट्रीयन पद्धतीच्या स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेतला. दुपारी २ वाजता हळदीचा सोहळा पारंपरिक मराठी पद्धतीने साजरा करण्यात आला. वधूपक्ष व वरपक्षातील महिला-भगिनींनी पारंपरिक वाद्यांच्या गजरात हळदीच्या कार्यक्रमात उत्साहात सहभाग घेतला. सायंकाळी ५.३० वाजता वरराजाची भव्य मिरवणूक (परण्या) काढण्यात आली. यानंतर सायंकाळी ७ वाजता वेदमंत्रांच्या पठणात व मंगलाष्टकांच्या जयघोषात विवाह विधी पार पडला. फटाक्यांची आतषबाजी व विद्युत रोषणाईमुळे विवाहसोहळा अधिकच देखणा झाला.



# विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक गॅजेटस्पासून दूर राहत छंद जोपासावेत

## प्रख्यात बासरी वादकपद्मश्री पंडित रोणू मजुमदार यांनी सूर्यदत्त संस्थेमधील कार्यक्रमात व्यक्त केले मत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"गुरु केवळ शैक्षणिक ज्ञान देत नाही, तर आयुष्याला दिशा देण्याचे काम करत असतो. आपल्यातील सर्वोत्तम गुण हेरून विद्यार्थ्यांना घडवण्याचे सामर्थ्य गुरुकडे असते. आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात गुरुचे स्थान अलौकिक आहे. आपण समर्पित भावनेने काम करत राहावे, तसेच विद्यार्थ्यांनी इलेक्ट्रॉनिक गॅजेटस् पासून दूर राहून छंद जोपासावेत. बासरीप्रमाणे भारतीय शास्त्रीय संगीताच्या रियाजामुळे विद्यार्थ्यांचा बुद्धी विकास सहज शक्य होऊन सर्वांगीण विकास साधला जाऊ शकेल," असे मत ज्येष्ठ बासरीवादक पद्मश्री पंडित रोणू मजुमदार यांनी व्यक्त केले. भारतीय संगीत ही अध्यात्माची वाट आहे. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने आयोजित कार्यक्रमात मुजुमदार बोलत होते. संगीत आणि गुरुकुल परंपरा यांचा संगम म्हणजे आपल्या संस्कृतीचे वैभव आहे, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनतर्फे पंडित रोणू मजुमदार यांना 'सूर्यदत्त सूर्यभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आला. शिक्षण, कला, समाजसेवा आदी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात येतो.

गायिका आनंदी रोणू मजुमदार, शास्त्रीय गायिका सानिया पाटणकर आणि प्रसिद्ध आर्किटेक्ट सुजाता कोडग यांना 'सूर्यदत्त राष्ट्रीय स्त्रीशक्ती पुरस्कार' देण्यात आला. सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया, उपाध्यक्षा व सचिव सुषमा चोरडिया व सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी रंगमंचीय कला महत्वाच्या भूमिका निभावतात. नाटक, नृत्य, गायन आणि अभिनय यांसारख्या कलांमुळे केवळ सर्जनशीलता वाढत नाही, तर नेतृत्वगुण, संवाद कौशल्य आणि निर्णयक्षमता सुधारते. रंगमंच हा शिक्षणाचा एक अविभाज्य भाग असायला हवा. विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक क्षेत्रातच नव्हे, तर कलाक्षेत्रातही प्रगती करावी, याकरिता सूर्यदत्तमध्ये कला, तसेच सर्वच क्षेत्रातील दिग्गजांना, युवा कलाकारांना निमंत्रित केले जाते. त्यांच्याशी संवादाचे आयोजन केले जाते.

मोबाइल, टीव्हीपासून अंतर ठेवत उच्च शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांनी छंद जोपासावेत आणि परिपूर्ण विकास घडवावा, यासाठी सूर्यदत्त सदैव प्रयोगशील राहील." पंडित मजुमदार यांनी बासरीवादन करीत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

सानिया पाटणकर यांनी आपल्या बहारदार आवाजात 'हे सुरानो चंद्र व्हा' नाट्यपद आणि संस्कृत गणेश वंदना सादर केली. रोणू व आनंदी या मुजुमदार दाम्पत्याने भक्तीरचना सादर केली. सानिया पाटणकर, आर्कि. सुजाता कोडग यांनीही व्यवसायातील विविध पैलूंवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. सूत्रसंचालन शोभा कुलकर्णी यांनी केले.

नरेंद्र कुलकर्णी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. मुख्य कार्यकारी अधिकारी अक्षित कुशल, संचालक प्रशांत पितालिया यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

## थोडक्यात



### जिल्हाध्यक्षपदी अभंग तर महिला आघाडीच्या अध्यक्षपदी ननावरे

**राजगुरूनगर/ किरण खुडे (आरंभ पर्व) : महाराष्ट्र परीट (धोबी) सेवा मंडळाच्या पुणे जिल्हाध्यक्षपदी विकास अभंग यांची तर महिला आघाडीच्या अध्यक्षपदी संगीता ननावरे यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र परीट (धोबी) सेवा मंडळाची वार्षिक सभा आळंदी (ता.खेड) येथे श्री संत गाडगे महाराज धर्मशाळेच्या सभागृहात खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी पुण्याचे माजी महापौर सुरेश नाशिककर होते. सभेसाठी जिल्ह्यातील विविध स्तरावरील पदाधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र परीट (धोबी) सेवा मंडळाचे प्रदेश उपाध्यक्ष संतोष भालेकर व सचिव संजय भागवत, सुभाष राऊत, सुधीर पाटोळे, हरिभाऊ काळे, सुवर्णा सावर्डे, वैशाली राऊत यांना कार्यकारीणी निवडीचे अधिकार देण्यात आले. पुढील पाच वर्षांसाठी निवडण्यात आलेली कार्यकारीणी पुढीलप्रमाणे : अध्यक्ष - विकास किसनराव अभंग (शिरूर), महिला आघाडी अध्यक्ष संगीता ननावरे, जिल्हा लॉन्ड्री संघटना अध्यक्ष राकेश मारुती कदम (खरपुडी बुद्रुक, ता. खेड), जिल्हा युवक आघाडी अध्यक्ष अक्षय कदम (भोर), तंटामुक्ती अध्यक्ष मनोज नांगरे. सभा कार्यक्रमाचे संयोजन संतोष भालेकर (आळंदी), नाना पवार (बारामती), सुभाष दळवी (जुन्नर), संजय भागवत (खेड), सखाराम ससाणे यांनी केले. नवनिर्वाचीत कार्यकारीणीचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. नवनिर्वाचीत अध्यक्षांनी यावेळी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय भागवत यांनी तर आभार सुभाष राऊत यांनी मानले.**



## ही सृष्टी कामगारांच्या कष्टावर उभी राहिली आहे : श्रीपाल सबनीस

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र ही संताची, शूरवीरांची, कष्टकऱ्यांची, कामगारांची भूमी आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात १०६ आंदोलक हुतात्मे झाले आहेत. या हुतात्म्यांच्या बलिदानामुळे व मराठी माणसाच्या आंदोलनामुळे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली. असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत उल्हासदादा पवार यांनी केले. जागतिक कामगार दिन व महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य कामगार सुरक्षा दल आणि झोपडपट्टी सुरक्षा दल या संघटनेच्या माध्यमातून सामाजिक चळवळीत उपेक्षितांना न्याय देण्यासाठी जीवाची परवा न करता सातत्याने आक्रमकपणे अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढा उभा केला. अशा कार्यकर्त्यांना सन्मानित करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष उल्हास दादा पवार हे होते. तर कार्यक्रमाचे संयोजक भगवानराव वैराट हे होते. या प्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तर कामगार नेते राजन नायर यांना नारायण लोखंडे पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप होते.

श्रीपाल सबनीस म्हणाले की ही सृष्टी कामगारांच्या कष्टावर उभी राहिली आहे. कामगार हा जगाचा निर्माता आहे म्हणूनच जगातल्या कामगारांनी एक होण्याच्या दृष्टीने जे तत्वज्ञान मानलं जो इतिहास निर्माण केला त्या कामगारांच्या कष्टाची त्याच्या कामाची आठवण ठेवण्यासाठी त्याला वंदन करण्यासाठी १ मे हा दिवस महत्वाचे आहे. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही फार मोठी होती. या चळवळीत अनेकांनी प्राणांची आहुती दिली होती. या दिनी मला महाराष्ट्र भूषण पुरस्कार देऊन सन्मान केला त्याचा मला सार्थ अभिमान आहे.

राजन नायर म्हणाले की देशात महाराष्ट्राचे योगदान हे फार मोठे आहे. महाराष्ट्रातील कामगार चळवळ ही सर्वांना न्यात आहे. पुण्यातील पिंपरी – चिंचवड ही उद्योगनगरीने अनेक रिकाम्या हातांना काम दिले आणि देत आहे.

## खराडीमध्ये मेसी ग्लोबल अरेना लाँच करण्यासाठी एक्झिकॉनने बटरफ्लाय फंटेंटमेंट्सशी भागीदारी केली

### पुण्यातील पहिले संगीत कार्यक्रम आणि लाईव्ह कार्यक्रमांचे ठिकाण सप्टेंबर २०२५ मध्ये उघडणार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एक्झिकॉन इव्हेंट्स मीडिया सोल्युशन्स लिमिटेड (बीएसई: एक्झिकॉन), एक आघाडीची एकात्मिक प्रदर्शन आणि कार्यक्रम निरासन कंपनी, ने बटरफ्लाय फंटेंटमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड, या युवा-केंद्रित मनोरंजन कंपनीसोबत एक निश्चित करार केल्याची घोषणा केली आहे. या कंपनीने संगीत कार्यक्रम आणि थेट कार्यक्रमांसाठी पुण्यातील पहिले समर्पित ठिकाण खराडी मेस ग्लोबल अरेना विकसित आणि चालवण्यासाठी करार केला आहे.

भारताच्या लाईव्ह मनोरंजन क्षेत्रासाठी एक महत्त्वाचा टप्पा : पुण्यातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या मनोरंजन आणि व्यावसायिक केंद्रांपैकी एक असलेल्या खराडी येथे रणनीतिकदृष्ट्या स्थित मेस ग्लोबल अरेनामध्ये खालील गोष्टी असतील:

- ५,००० क्षमतेचे इनडोअर कॉन्सर्ट अरेना, थेट संगीत सादरीकरणे, विनोदी कार्यक्रम आणि मनोरंजन सादरीकरणांसाठी डिझाइन केलेले.
- उत्सव, प्रदर्शने, विवाहसोहळे आणि सामुदायिक कार्यक्रम आयोजित करण्यासाठी डिझाइन केलेले ६,००० क्षमतेचे बाह्य बहुउद्देशीय स्थान

हे ठिकाण सप्टेंबर २०२५ पासून कार्यरत होणार आहे आणि भारतातील सर्वात चैतन्यशील शहरी बाजारपेठांपैकी एक असलेल्या कॉन्सर्ट कार्यक्रम आयोजकांसाठी समर्पित पायाभूत सुविधा शोधणाऱ्यांसाठी एक प्रमुख केंद्र म्हणून काम करेल.

एक्सिकॉनला अपेक्षा आहे की पहिल्या पूर्ण आर्थिक वर्षात हे ठिकाण २०-२५ लाईव्ह कार्यक्रमांचे आयोजन करेल, ज्यामध्ये संगीत कार्यक्रम, महोत्सव, कॉर्पोरेट कार्यक्रम आणि सांस्कृतिक प्रदर्शनांची संख्या वाढत जाईल.

सुरुवातीचे वार्षिक उत्पन्न १०-१५ कोटी रुपयांच्या दरम्यान असल्याचा अंदाज आहे, ज्यामध्ये २५-३०% EBITDA मार्जिन आहे, जे ठिकाण भाडेपट्टा, तिकीट भागीदारी, प्रायोजकत्व, अन्न आणि पेये, पार्किंग आणि ब्रँडिंग अधिकारांद्वारे चालते.

एक्झिकॉन इव्हेंट्स मीडिया सोल्युशन्स लिमिटेडचे सीएफओ सुशील शाह म्हणाले, "भारताच्या वेगाने वाढणाऱ्या लाईव्ह इव्हेंट्स आणि तरुण मनोरंजन अर्थव्यवस्थेला आधार देणारी पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या आमच्या प्रवासात हा करार एक धोरणात्मक मैलाची घटक उपलब्धी आहे."

एक्झिकॉनच्या सह-संस्थापक पद्मा मिश्रा म्हणाल्या, "मेस ग्लोबल अरेना केवळ पुण्याच्या स्थळ परिसंस्थेतील दीर्घकाळापासून असलेली पोकळी भरून काढणार नाही तर शहराला प्रमुख कार्यक्रम आणि उत्सवांसाठी एक गंभीर ठिकाण म्हणून स्थापित करेल."

# कलाकारांचा 'सूर्यदत्त'च्या वतीने विशेष सन्मान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"चित्रपटातील कलाकार, त्यांच्या नवनव्या कलाकृतींवर विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधण्याचे केंद्र अशी सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सची ओळख निर्माण झाली आहे. चित्रपटांच्या निमित्ताने दिग्गज कलाकारांसह दिग्दर्शक, निर्माता संस्थेत येऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधतात. विद्यार्थ्यांसमोर आपले भावविश्व उलगडतात. त्यातून विद्यार्थ्यांना अनुभवाचे शिक्षण, या क्षेत्रातील विविध कौशल्ये विकसित होण्यास मदत होते. त्याचे व्यक्तिमत्व अधिक समृद्ध होते," असे मत सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी व्यक्त केले.



सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ परफॉर्मिंग आर्टस आणि सूर्यदत्त प्रॉडक्शन हाऊसच्या वतीने आयोजित 'गुलकंद' या आगामी चित्रपटातील कलाकारांचा 'सूर्यदत्त'मधील विद्यार्थ्यांशी खास संवाद कार्यक्रमात प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया बोलत होते. संस्थेच्या उपाध्यक्ष व सचिव सुषमा चोरडिया, सहयोगी उपाध्यक्ष स्नेहल नवलखा होते. प्रसिद्ध अभिनेते समीर चौघुले, अभिनेत्री ईशा डे, दिग्दर्शक प्रसाद ओक, कलाकार सचिन गोस्वामी, सचिन मोटे, शर्विल आगटे, दशरथ सिरसाठ आणि गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपले अनुभव, प्रेरणादायी गोष्टी आणि चित्रपट क्षेत्रातील प्रवास सांगितला.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांच्या मार्गदर्शनाखाली 'संवादातून सर्वांगीण विकास' या कल्पनेतून 'नॉलेज इंनीशीएटिव्ह'अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. लक्ष्मीकांत गुंड यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. यावेळी 'सूर्यदत्त'च्या वतीने प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया व सुषमा चोरडिया यांच्या हस्ते सर्व कलाकारांचा विशेष सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत कलाकारांशी थेट संवाद साधला. 'गुलकंद' चित्रपटातील कथानक, निर्माण प्रक्रियेतील आव्हाने व त्यामागील प्रेरणा यावर दिलखुलास चर्चा झाली. विद्यार्थ्यांनी आपले प्रश्न विचारत कलाकारांकडून मोलाच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

हास्यजत्रेतून आपल्या अभिनयाचा वेगळा ठसा उमटविणाऱ्या समीर चौघुले म्हणाले, "आपल्या जीवनात हास्याचे अधिक महत्व आहे. आजच्या गुंतागुंतीच्या आणि धावपळीच्या जगण्यात हसणे गरजेचे झाले आहे. एकूणच मनो-शारीरिक आरोग्याकरिता हसणे आवश्यक आहे. 'गुलकंद'मधूनही प्रेक्षकांनी हसतहसत चित्रपट पाहावा हा प्रयत्न आहे." विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करावे आणि मनाजोगे ध्येय गवसले की झोकून देऊन काम करावे. सातत्यपूर्ण परिश्रम, प्रयत्न आणि निष्ठा हे यशाचे गमक असल्याचे प्रसाद ओक यांनी सांगितले.

'गुलकंद' हा चित्रपट नव्या धाटणीची कथा घेऊन प्रेक्षकांसमोर येत असून, मनोरंजनासोबतच एक सामाजिक संदेशही देत असल्याचे सचिन मोटे यांनी नमूद केले. शर्विल आगटे यांनीही मनोगत व्यक्त केले. प्रा. श्वेता राठोड कटारिया यांनी सूत्रसंचालन केले. या आगळ्यावेगळ्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्याचे व सकारात्मक ऊर्जेचे वातावरण निर्माण झाले.



# सत्व सुकुनने चौथ्या तिमाहीत नफ्यात ७४.५% वाढ नोंदवली, ४८ कोटी रुपयांचा राईट्स इश्यु मांडला

- आर्थिक वर्ष 2025 मध्ये चौथ्या तिमाहीत निव्वळ नफा 74.5% वाढून 84.22 रुपये लाख झाला
- आर्थिक वर्ष 2025 मध्ये ऑपरेशन्सचे उत्पन्न 6% वाढून 105.16 लाख रुपये झाले
- आर्थिक वर्ष 2025 च्या 12 महिन्यांत निव्वळ नफा 108.9% वाढून 248.94 लाख रुपये झाला
- आर्थिक वर्ष 2025 च्या 12 महिन्यांत ऑपरेशन्सचे उत्पन्न 48.1% वाढून 526.3 लाख रुपये झाले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

गृह सजावट आणि सुगंधित प्रोडक्ट्स उत्पादनात गुंतलेली कंपनी सत्व सुकुन लाइफकेअर लिमिटेड (BSE : 539519) कंपनीने 31 मार्च 2025 रोजी संपलेल्या चौथ्या तिमाही आणि बारा महिन्यांसाठी मजबूत आर्थिक परिणाम नोंदवले आहेत.

31 मार्च 2025 रोजी संपलेल्या तिमाहीत, कंपनीचा निव्वळ नफा 74.5% वाढून 84.22 लाख रुपये झाला, जो मागील वर्षी याच कालावधीत 48.19 लाख होता. 31 मार्च 2025 रोजी संपलेल्या तिमाहीत ऑपरेशन्सचे उत्पन्न 6% वाढून 105.16 लाख रुपये झाले, जे मागील वर्षी याच कालावधीत ₹99.23 लाख होते.

31 मार्च 2025 रोजी संपलेल्या बारा महिन्यांसाठी, कंपनीचा निव्वळ नफा 108.9% वाढून 248.94 लाख रुपये झाला, जो मागील वर्षी याच कालावधीत 119.04 लाख रुपये होता. 31 मार्च 2025 रोजी संपलेल्या बारा महिन्यांसाठी ऑपरेशन्सचे उत्पन्न 48.1% वाढून 526.30 लाख रुपये झाले, जे मागील वर्षी याच कालावधीत 355.33 लाख रुपये होते.

सत्व सुकुन लाइफकेअर लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री मीत तरुणकुमार ब्रह्मभट म्हणाले की, "कंपनीचे यश नावीन्यपूर्ण उत्पादन विकास, उत्पादन क्षमतांमधील गुंतवणूक आणि वाढणारा ग्राहक आधार यांच्या संयोगाने प्रेरित आहे, जे दीर्घकालीन शाश्वत वाढीच्या दिशेने आपला मार्ग मजबूत करते. ही मजबूत कामगिरी, सत्व सुकूनच्या वाढीव कार्यक्षमतेचे प्रतिबिंबित करते. सोबतच बाजारातील ट्रेंड आणि उद्योगातील प्रमुख खेळाडू बणण्याची वचनबद्धता दर्शवते"

त्याच्या सशक्त ऑपरेशनल कामगिरीव्यतिरिक्त, सत्व सुकुन लाइफकेअर लिमिटेडने तिच्या राईट्स इश्यूच्या अटींना अंतिम रूप दिले आहे, ज्याला जानेवारी 2025 मध्ये सुरुवातीला मंजूरी देण्यात आली होती. कंपनीचे लक्ष्य ₹1 चे दर्शनी मूल्य असलेले 48 कोटी इक्विटी शेअर्स ₹1 प्रति शेअरच्या किमतीने ऑफर करून 48 कोटी रुपये उभारण्याचे आहे. शुक्रवार, 09 मे 2025 रोजी निश्चित केलेल्या रेकॉर्ड तारखेनुसार, समभागधारकांना प्रत्येक 2 समभागांमागे 5 नवीन शेअर्स मिळतील.

कंपनीचा राईट्स इश्यू शुक्रवार, 28 मे, 2025 रोजी उघडेल आणि बाजार पूर्तता करण्याची अंतिम मुदत सोमवार, 06 जून 2025 आहे आणि ती गुरुवार, 11 जून, 2025 रोजी बंद होणार आहे (विस्ताराच्या अधीन, परंतु उघडण्याच्या तारखेपासून 30 दिवसांपेक्षा जास्त नाही). जर इश्यू पूर्णपणे सबस्क्राइब झाला तर, कंपनीचे थकबाकीदार शेअर्स 67.2 कोटीपर्यंत वाढतील, जे भविष्यातील वाढीच्या पुढाकारांना आणि धोरणात्मक गुंतवणुकीला समर्थन देण्यासाठी तिचा भांडवली पाया मजबूत करेल.

गेल्या काही तिमाहीत, सत्व सुकुनची सातत्यपूर्ण आणि मजबूत आर्थिक कामगिरी कंपनीची धोरणात्मक दृष्टी, ऑपरेशनल उत्कृष्टता आणि मजबूत बाजारातील स्थितीचा पुरावा आहे. आवकमध्ये सातत्यपूर्ण वाढ, वाढता नफा आणि प्रीमियम सुगंध आणि होम डेकोर उत्पादनांची वाढती मागणी यासह, कंपनीने उच्च-गुणवत्तेची मानके राखून ऑपरेशनल कामगिरीचा विस्तार करण्याची क्षमता दाखवून दिली आहे.

## थोडक्यात



### खेड तालुक्यात दहा गावे आणि ४९ वाड्या-वस्त्यांवर तीव्र पाणीटंचाई

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : खेड तालुक्यातील दहा गावे आणि त्यांच्या ४९ वाड्या-वस्त्यांमध्ये तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. टँकरचे प्रस्ताव खेड पंचायत समितीकडे प्राप्त झाले आहेत. त्यापैकी तीन गावांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केल्याची माहिती गटविकास अधिकारी विशाल शिंदे यांनी दिली. खेड तालुक्यात दरवर्षी उन्हाळा सुरू झाला की अनेक गावांत, वाड्या-वस्त्यांवर पाण्याची टंचाई निर्माण होते. कायमस्वरूपी स्रोत किंवा उद्भव नसल्याने उपलब्ध पाणी योजना टंचाई काळात निरुपयोगी ठरतात. अनेक गावांच्या वाड्या-वस्त्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो. तालुक्यात गेल्या वर्षी एप्रिलमध्ये पूर, वरुडे, जऊळके येथे टँकर सुरू झाले होते; तर एप्रिल, मे आणि जून महिन्यात तालुक्यात तब्बल १५ टँकरने २१ गावे व त्यांच्या वाड्या-वस्त्यांमध्ये पाणीपुरवठा करण्यात आला. यावर्षी एप्रिलच्या पहिल्याच आठवड्यात तीन गावांना टँकरने पाणी पुरवण्यास सुरुवात झाली आहे. खेड पंचायत समितीकडे वरुडे, वाफगाव, गुळाणी, कोयाळी तर्फे वाडा, वडगाव नजीक खेड, गोसासी, वाडा, बहिरवाडी, साबुर्डी आणि वाकळवाडी अशा दहा गावांसह ४९ वाड्या-वस्त्या मिळून १६ हजार ८७४ नागरिकांना पाणीटंचाईची झळ बसली आहे. टँकर मागणीचे प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी वडगावनजीक खेड येथे पाणी काही प्रमाणात उपलब्ध आहे. तर पुर्व भागातील वरुडे, वाफगाव आणि गुळाणी या गावांमध्ये ३० मार्चपासून टँकर सुरू झाले आहेत. वरुडे गावठाण, गणेशनगर, चौधरवाडी, पांढरवस्ती, अलीकड पलीकडची बेंद, मुलकीवस्ती, नालगड, पंचवाडी, कातोरेमळा, पलीकडील नहयार, तांबेवाडी, वाळुंजस्थळ यांना दिवसाला ५ फेऱ्या टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. वाफगाव मांदळेवस्ती, गावठाण, मांदळेवाडी, टाकळकरवाडी, लंगोटेवस्ती, रामाणेवाडी आणि शिंदेवस्ती यांना दिवसाला पाच फेऱ्या टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. गुळाणी गावठाण, आरुडेवस्ती, ढेरंगेवस्ती, गुळानकरवस्ती, भिगावस्ती, जरेवाडी रस्ता, सिद्धार्थनगर या वाड्या-वस्त्यांना टँकरच्या तीन फेऱ्यांद्वारे पिण्यासाठी पाणी पुरविण्यात येत आहे.

## स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या प्रचाराचा शुभारंभ

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

एस. टी. कष्टकरी जनसंघ पुरस्कृत स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि. पुणे विभाग पंचवार्षिक निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ राजगुरुनगर येथील दत्त मंदीरात श्रीफळ वाढवून करण्यात आला. तसेच यावेळी उमेदवार परिचयपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी महाराष्ट्र राज्य एसटी बँक संचालक अजित मगरे, दत्ता खेडकर, प्रचार प्रमुख रुपेश माने, विभागीय सचिव संतोष एरंडे, वाहतुक नियंत्रक नागेश्वर वैरागर, अमोल भुते, वंदना बुरुड, महादेव तुळसे आदी उपस्थित होते. स्टेट ट्रान्सपोर्ट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणूकीत यंदा प्रथमच मोठी चुरस निर्माण झाली आहे. कामगार संघटना व कष्टकरी जनसंघ यांनी स्वंतत्ररीत्या पॅनेल उभे केले आहे. पुणे विभागात राजगुरूनगर, मंचर, नारायणगाव, शिवाजीनगर, स्वारगेट शिरुर, तळेगांव, बारामती, दौंड, इंदापुर, पिंपरी-चिंचवड, भोर, सासवड या एसटी आगारात काम करणारे कर्मचारी मोठ्या संख्येने या संस्थेचे सभासद आहेत. अनेकदा बिनविरोध निवडणूक होणाऱ्या या संस्थेत यावेळी सर्व जागा दोन्ही पॅनेल ताकदीने लढविणार आहेत.

## वडगाव येथे ऑपरेशन सिंदूरचा आनंदोत्सव



**वडगाव बु (दै. आरंभ पर्व)**

पहलगाम येथील भ्याड दहशतवादी हल्ल्यात निष्पाप भारतीय नागरिकांचा बळी गेला. ज्यांचे कुंकू पुसले गेले त्या माता - भगिनींच्या अश्रूना उत्तर देण्यासाठी भारतीय सेनेने पाकिस्तानात घुसून 'ऑपरेशन सिंदूर' अंतर्गत दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. त्याबद्दल खडकवासला मतदार संघाचे आ. .भिमराव तापकीर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी - खडकवासला विधानसभा मतदार संघाच्या वतीने आज वडगाव बुद्रुक,बस स्टॉप येथे आई महालक्ष्मी देवीची आरती करून विजयोत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी भारतीय सैन्यांचे कौतुक करून आभार व्यक्त करण्यात आले.तसेच जय जवान-जय किसान,भारत माता की जय,वंदे मातरम,या घोषणा देण्यात आल्या. देशाचे यशस्वी नेतृत्व करणारे लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या ठाम निर्णयामुळे दहशतवाद्यांना चोख प्रत्युत्तर देण्यात आले आहे. अशी प्रतिक्रिया उपस्थित मान्यवरांनी दिली.

यावेळी मा. नगरसेवक हरिदास चरवड, मा.नगरसेविका निताताई दांगट,हेमंत दादा दांगट, अंनत दांगट, सारंग नवले,केदार जाधव,सचिन मनेरे,विशाल उभे,दत्तात्रय देशपांडे, ऋषाली शेकदार, विरेंद्र ईनामदार, सागर पोळेकर,समीर रायकर .आशिष कदम पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.मंडल अध्यक्ष यशवंत लायगुडे यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले.

### आर्थिक वर्ष २०२५च्या दुसऱ्या सहामाहीत

## बाहेती रिसायकलिंग इंडस्ट्रीजच्या निव्वळ नफ्यात १५९% वाढ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

बाहेती रीसायकलिंग इंडस्ट्रीज लिमिटेड (NSE: BAHETI), ही ॲल्युमिनियम रीसायकलिंग आणि ॲल्युमिनियम मिश्र धातु आणि डी-ऑक्स मिश्र धातुंच्या निर्मितीमध्ये गुंतलेली एक आघाडीची कंपनी आहे. कंपनीने 31 मार्च 2025 रोजी संपलेल्या सहामाही आणि पूर्ण वर्षाचे आर्थिक निकाल जाहीर केले आहेत, ज्यात आवक आणि निव्वळ नफ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. 31 मार्च 2025 रोजी संपलेल्या सहामाही कालावधीसाठी, कंपनीने 26,716.90 लाख रुपयांची आवक नोंदवली जी मागील वर्षांची 22,265.92 लाख रूपये आवकपेक्षा 20% जास्त आहे. निव्वळ नफा 158.7% ने वाढून 1,098.93 लाख रुपये केला, जो मागील वर्षात ह्याच कालावधीत 424.77 लाख रुपये होता. हे उत्कृष्ट परिणाम कंपनीची मजबूत ऑपरेशनल कार्यक्षमता आणि वाढती मागणी दर्शवतात. 31 मार्च 2025 रोजी संपलेल्या पूर्ण आर्थिक वर्षासाठी, बाहेती रीसायकलिंग इंडस्ट्रीजने 52,453.87 लाख रुपयांची आवक नोंदवली होती. जी मागील वर्षात झालेली आवक 42,945 लाख रुपये पेक्षा 22.1% जास्त आहे. संपूर्ण आर्थिक वर्षासाठी कंपनीचा निव्वळ नफा 150% ने वाढून 1,800.98 लाख वर पोहोचला, जो एकावर्षाआधी 720.08 लाख होता. हे आंकडे सर्व व्यावसायिक क्षेत्रांमध्ये कंपनीची मजबूत कामगिरी दर्शवते.

परिणामांवर भाष्य करताना बाहेती रिसायकलिंग इंडस्ट्रीज लिमिटेडचे जॉइंट मॅनेजिंग डायरेक्टर यश शाह म्हणाले की "दुसऱ्या सहामाहीत आणि संपूर्ण आर्थिक वर्षातील मजबूत आर्थिक कामगिरी आमच्या व्यवसायाची लवचिकता आणि भारतातील पर्यावरणास अनुकूल शाश्वत रिसायकलिंग पद्धतींची वाढती ओळख दर्शवते. आम्ही ऑपरेशनल उत्कृष्टतेसाठी वचनबद्ध आहोत आणि अर्थव्यवस्थेत अधिक योगदान देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

बाहेती रिसायकलिंग इंडस्ट्रीज भारतातील स्क्रॅप प्रोसेसिंगआणि रिसायकलिंग मध्ये आघाडीवर आहे आणि 12 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये कंपनीची उपस्थिती आहे. कंपनी जपान, कॅनडा, यूएस, चीन, हाँगकाँग, UAE, तैवान इ. येथील ग्राहकांना सेवा देखील प्रदान करते. तिची सतत आर्थिक वाढ ॲल्युमिनियम रीसायकलिंग विभागातील एक विश्वासू पुरवठादार म्हणून तिचे स्थान मजबूत करते.

बाहेती रिसायकलिंग इंडस्ट्रीजचे शेअर्स सोमवारी 621 रुपये वर बंद झाले, जे पूर्वी 619.20 च्या बंद पेक्षा 0.29% जास्त होते.

शेअर 628.85 रुपये वर उघडला आणि दिवसांत 77 लाख हून अधिकच्या व्यवसाय बरोबर 649.90 रूपये बरोबर 52 आठवड्यांचा नवीन उच्चांकही गाठला. कंपनीचे मार्केट कॅप रु. 643.89 कोटी होते.

### १४४ ग्रामपंचायतींच्या

## सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

**किरण खुडे**

**राजगुरूनगर (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यातील १६२ पैकी १४४ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाची आरक्षण सोडत राजगुरुनगर येथे घेण्यात आली. या सोडतीमध्ये आलेल्या आरक्षणामुळे उपस्थितांमध्ये 'काहींना नाराजी तर काही ठिकाणी उत्साह 'असे चित्र दिसून आले. सन २०२५ ते २०३० या कालावधीत होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी १४४ ग्रामपंचायतींची सरपंचपदाची आरक्षण सोडत तहसीलदार प्रशांत बेडसे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी नायब तहसीलदार राम बिजे, गटविकास अधिकारी विशाल शिंदे, मंडलाधिकारी गणेश रोकडे, नीलेश घोडके, योगेश पाडळे, संकेत तनपुरे उपस्थित होते. दोन शालेय विद्यार्थ्यांच्या हस्ते चिठ्यांद्वारे आरक्षण काढण्यात आले. तालुक्यातील विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी यांनी सरपंचपदाच्या सोडतीकडे पाठ फिरवली होती. काही निवडक गावांतील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, त्यांचे समर्थक आरक्षण सोडतीला उपस्थित होते.

### एका महीलेची उपस्थिती

**सरपंचपदासाठी महिलांना ५० टक्के आरक्षण आहे. असे असताना देखील या आरक्षण सोडतीसाठी सुमारे १४४ गावांमधून सभागृहात केवळ एकच महिला उपस्थित होती. बहुतांशी ठिकाणी नामधारी सरपंच या महिला असतात. परंतु प्रत्यक्षात गावकीचा सर्व कारभार पती महाशयच पाहतात. त्यामुळे त्यांची उपस्थिती नाही, महिला उपस्थितीबाबत हा सभागृहात उपस्थितांमध्ये चर्चेचा विषय ठरला.**

# व्हर्च्युअल गॅलेक्सी इन्फोटेक लिमिटेडचा आयपीओ ०९ मे रोजी खुला होणार

- प्रति इक्विटी शेअर ₹१३५-₹१४२ हा प्राइस बँड निर्धारीत करण्यात आला आहे
- या आयपीओमध्ये बुक-बिल्डिंग प्रक्रियेच्या माध्यमातून रु.१० दर्शनी मूल्य असलेल्या ६५.७ लाख इक्विटी शेअर्सच्या फ्रेश इश्युचा समावेश आहे.
- या आयपीओमधून मिळणाऱ्या एकूण रकमेपैकी रु.३४.२७ कोटी नागपूर येथे नवीन डेव्हलपमेंट फॅसिलिटी उभारण्यासाठी भांडवली खर्चावर, रु.३.०० कोटी कंपनीने घेतलेल्या काही कर्जाच्या परतफेडीसाठी/अग्रीम परतफेडीसाठी, रु.५.०५ कोटी डेटा सेंटरसाठी जीपीयू, सर्व्हर आणि स्टोरेज सिस्टिम खरेदीसाठी, रु.१८.९० कोटी विद्यमान प्रॉडक्ट्सच्या सुधारणेसाठी, देखभालीसाठी आणि अद्ययावत करण्यासाठी आणि रु.१४.०६ कोटी व्यवसायविकास व विपणनाशी संबंधित खर्चासाठी वापरण्याचा व्हीजीआयएलचा मानस आहे. उर्वरित रक्कम सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी वापरली जाणार आहे.

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

व्हर्च्युअल गॅलेक्सी इन्फोटेक लिमिटेड ही बीएफएसआय क्षेत्रात सेवा देणाऱ्या आघाडीच्या हायब्रिड SaaS आणि एंटरप्राइझ सॉफ्टवेअर कंपन्यांपैकी एक असून, त्यांची इनिशिअल पब्लिक ऑफर (आयपीओ) शुक्रवार, ०९ मे २०२५ रोजी सबस्क्रिप्शनसाठी खुली होणार आहे. अँकर गुंतवणूकदारांचा हिस्सा गुरुवार, ०८ मे २०२५ रोजी खुला होईल आणि हा इश्यू बुधवार, १४ मे २०२५ रोजी बंद होईल. या ऑफरद्वारे कंपनीला रु.९३.२९ कोटी उभारण्याचा उद्देश आहे आणि ही लिस्टिंग एनएसई इमर्ज प्लॅटफॉर्मवर होण्याचा प्रस्ताव आहे. या इश्यूसाठी प्रति इक्विटी शेअर ₹१३५ ते ₹१४२ असा प्राइस बँड निर्धारीत करण्यात आला आहे. किमान बिड लॉट १,००० इक्विटी शेअर्सचा असेल. कंपनीने जुलै २०२४ मध्ये प्री-आयपीओ फंडिंग राऊंडमध्ये नावाजलेल्या गुंतवणूकदारांकडून रु.२१.४४ कोटी उभारण्यात आले आहेत. या ऑफरसाठी स्मार्ट होरायझन कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड हे बुक रनिंग लीड मॅनेजर आहेत आणि माशितला सिक्युरिटीज प्रायव्हेट लिमिटेड हे या ऑफरसाठी रजिस्ट्रार आहेत.

या आयपीओमध्ये बुक-बिल्डिंग प्रक्रियेच्या माध्यमातून रु.१० दर्शनी मूल्य असलेल्या ६५.७ लाख इक्विटी शेअर्सच्या फ्रेश इश्युचा समावेश आहे. यापैकी १८,४०,००० इक्विटी शेअर्स अँकर गुंतवणूकदारांसाठी, ३,३६,००० इक्विटी शेअर्स मार्केट मेकरसाठी, ९,५०,००० इक्विटी शेअर्स नॉन-इन्स्टिट्युशनल गुंतवणूकदार (NII) भागासाठी, १२,४४,००० इक्विटी शेअर्स पात्र संस्थात्मक गुंतवणूकदार (QIB) भागासाठी तर २२,००,००० इक्विटी शेअर्स रिटेल गुंतवणूकदार (RII) भागासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत.रेड हेरिंग प्रॉस्पेक्टसमध्ये नमूद केल्याप्रमाणे, व्हीजीआयएल आयपीओमधून मिळणाऱ्या एकूण निधीपैकी रु.३४.२७ कोटी नागपूरमध्ये अतिरिक्त डेव्हलपमेंट फॅसिलिटी उभारण्यासाठी होणाऱ्या भांडवली खर्चासाठी, रु.३.०० कोटी कंपनीने घेतलेल्या काही कर्जाच्या परतफेडीसाठी किंवा आगाऊ परतफेडीसाठी, रु.५.०५ कोटी डेटा सेंटरसाठी जीपीयू, सर्व्हर आणि स्टोरेज सिस्टिमच्या खरेदीसाठी, रु.१८.९० कोटी विद्यमान प्रॉडक्ट्सच्या सुधारणा, देखभाल आणि अद्ययावत करण्याशी संबंधित खर्चासाठी आणि रु.१४.०६ कोटी व्यवसायविकास आणि विपणन उपक्रमांसाठी वापरण्याचा उद्देश आहे. उर्वरित भांडवल सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी वापरण्यात येणार आहे.

नागपूरमध्ये मुख्यालय असलेली ही SaaS प्रॉडक्ट-केंद्रित कंपनी बीएफएसआय, ईआरपी आणि ई-गव्हर्नन्स क्षेत्रांसाठी कोअर बँकिंग सॉफ्टवेअर सोल्यूशन्स, आयटी सोल्यूशन्स, ईआरपी इम्प्लिमेंटेशन, कस्टमाइज्ड सॉफ्टवेअर सोल्यूशन्स डेव्हलपमेंट आणि आयटी सेवा प्रदान करते. कंपनी मुख्यतः सॉफ्टवेअर ॲप्लिकेशनचा विकास, कस्टमायझेशन, इन्स्टॉलेशन आणि इम्प्लिमेंटेशन यामध्ये सहभागी आहे, तसेच डिलिव्हरी सोल्यूशन्ससाठी अंमलबजावणीनंतरचे सखोल सहाय्य, मॉनिटरिंग आणि देखभाल सेवा देखील पुरवते.व्हीजीआयएलच्या ग्राहकांमध्ये कमर्शियल बँका, राज्य सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, सहकारी संस्था, एनबीएफसीज आणि सेव्हिंग्ज अँड क्रेडिट कोऑपरेटिव्ह सोसायटीज (SACCOs) यांचा समावेश आहे.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.